**राज्यातील सर्व अभिमत विद्यापीठातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश सन २०१७-२०१८ या शैक्षणिकवर्षापासुन एकत्रित समुपदेशनामार्फत (Combined counseling) करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्र. सीईटी -३५१६/ प्र.क्र.४७८ /१६/ शिक्षण-२,**
नववा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१,
**दिनांक :२०.०१.२०१७**

**संदर्भ** :

१. महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शिक्षण संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) २०१५,अधिनियम
२. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ १-६/२०१६(सीपीपी-आय/डीयु)दिनांक १५.०९.२०१६.
३. आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.व्ही. ११०२५/०४/२०१६-एमईपी, दिनांक ०५.१२.२०१६
४. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी १०१५/प्र.क्र. ३९६/१५/ शिक्षण-२, दिनांक १६.१२.२०१५

**प्रस्तावना** : महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शिक्षण संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम,२०१५ अन्वये राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश हे आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्याव्दारा सामाईक प्रवेशपरिक्षेव्दारा करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, संदर्भ क्रमांक ४ वरील दिनांक १६.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयव्दारे शासकीय व महानगरपालिकेच्या महाविद्यालयातील प्रवेशप्रक्रीया सुध्दा खासगी विनाअनुदानित संस्थांसोबत एक खिडकी पध्दतीने आयुक्त, राज्य सामाईक प्रवेशपरिक्षा कक्ष यांचेमार्फत राबविणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे अभिमत विद्यापीठातील प्रवेशाच्या अनुषंगाने सर्व अभिमत विद्यापीठांनी संबधित राज्यशासनाच्या एकत्रित समुपदेशन (Combined Counseling) प्रवेशप्रक्रीयेत सहभागी होणेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भाधीन पत्र क्रमांक २ मध्ये नमूद केले आहे. तसेच, राज्यातील सर्व वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील (अभिमत विद्यापीठांसह) पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता एकत्रित समुपदेशन (Combined Counseling) आयोजन

करण्याबाबत केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये सुचित केले आहे. त्यानुषंगाने अभिमत विद्यापीठातील पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

राज्यातील अभिमत विद्यापीठातील वैद्यकीय व दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश एकत्रित समुपदेशनाद्वारे/केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Combined Counseling/Centralized Admission Process) करणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हितकारक आहे. तसेच, केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे दिनांक ०५.१२.२०१६ आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक १५.०९.२०१६ च्या पत्रातील आदेश विचारात घेता, राज्यातील सर्व अभिमत विद्यापीठांतील वैद्यकीय व दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता केंद्रशासनामार्फत घेण्यात येणाऱ्या अनुक्रमे NEET-PG (National Eligibility-cum-Entrance Test-PG व NEET-MDS( National Eligibility-cum-Entrance Test-MDS) या प्रवेशपरिक्षेतील गुणवत्तेनुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासुन एकत्रित समुपदेशनाद्वारे/केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे(Combined Counseling/Centralized Admission Process) करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२.अभिमत विद्यापीठातील वैद्यकीय व दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विषयनिहाय ५० टक्के संस्थात्मक प्रवेश वगळता उर्वरित ५० टक्के जागांवरील प्रवेश एकत्रित समुपदेशनाव्दारे/केंद्रीभुत प्रवेशप्रक्रीयेव्दारे (Combined Counseling/CAP) करण्याची जबाबदारी ही आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(**अंजली वि.अंभिरे**)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई

मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली.
मा.सचिव, भारतीय दंत परिषद, ऐबान-ए-गालिब मार्ग, कोटला रोड, टेंपल लेन, नवी दिल्ली.
मा.सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली.
अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/प्राचार्य, सर्व अभिमत विद्यापीठे/सर्व शासकीय व महानगरपालिका वैद्यकीय व दंत महाविद्यालय/सर्व खाजगी अनुदानित व विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालय.
निवड नस्ती ( कार्यासन – शिक्षण-२).